महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

news.thanejeevandeep@gmail.com

Rs.2/-

रविवार ❖१२ जानेवारी २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक १९८ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

# महाविकास आघाडीत बिघाडीचे संकेत







**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ मुंबई(प्रतिनिधी)**

लोकसभा निवडणुकीच्या यशानंतर विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठा फटका बसला. यानंतर महाविकास आघाडीतील धुसफूस समोर येत आहे. नुकताच काँग्रेस नेते नितीन राऊत यांनी महाविकास आघाडीला घरचा आहेर दिला.

यानंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी काँग्रेस आणि ठाकरे गटाला टोला लगावला. यामुळे आगामी महा पालिकेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी एकत्र लढणार की स्वतंत्र मैदानात उतरणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. त्यातच आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी महानगर पालिका, जिल्हा परिषद आणि नगर पंचायतीच्या निवडणूक स्वबळावर लढवण्याची घोषणा केली आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीचा दारूण पराभव झाला तर महाविकास आघाडीचा भरघोस यश मिळाले. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने अनपेक्षित बहुमत मिळवत आपली सत्ता कायम टिकवली आणि राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार स्थापन झाले. तर महाविकास आघाडीला मोठा फटका बसल्याचे दिसून आले. यानंतर नितीन राऊत यांनी मविआला टोला लगावला. लोकसभेनंतर आम्ही मुख्यमंत्रिपदासाठी वाद घातले, एकमेकांवर कुरघोड्या केल्या, असे म्हणत त्यांनी मविआला घरचा आहेर दिला. तर अमोल कोल्हे यांनी काँग्रेसची मोडलेली पाठ सरळ होत नाही अन् शिवसेनेला अजून जाग येत नाही, असे म्हणत मित्रपक्षांवर निशाण साधला. यानंतर संजय राऊत यांनी आगामी निवडणुकीबाबत मोठी घोषणा केली आहे. नागपूरपासून मुंबईपर्यंत आम्ही स्वबळावर लढणार संजय राऊत संजय राऊत म्हणाले की, नागपूरपासून मुंबईपर्यंत आम्ही स्वबळावर लढणार आहे. एकदा आम्हाला पाहायचे आहेच, जे काही होईल ते होईल, आमचं असं ठरतंय. मुंबई, ठाणे नागपूरमध्ये कार्यकर्त्यांना संधी केव्हा देणार? कार्यकर्त्यांना संधी न दिल्यामुळे पक्ष वाढीला फटका बसतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका सर्व पक्षांनी स्वबळावर लढवाव्या आणि आपापल्या कार्यकर्त्यांना संधी द्यावी, अशी घोषणा त्यांनी केली आहे. संजय राऊत यांच्या घोषणेनंतर आता महाविकास आघाडीतील मित्रपक्ष नेमकी काय भूमिका घेणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. चर्चा करुन निर्णय घ्यायला हवा : जितेंद्र आव्हाड संजय राऊत यांच्या घोषणेनंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी याबाबत वक्तव्य केले आहे. ठाकरे गटाचा निर्णय झाला असेल तर थांबवणारे आम्ही कोण? राऊतांनी चर्चा करुन निर्णय घ्यायला हवा होता, अशी प्रतिक्रिया त्यांनी संजय राऊत यांच्या स्वबळाच्या नाऱ्यावर दिली आहे.

# वाहतुकीच्या नियमांचे पालन ही सर्वांची सामूहिक जबाबदारी

## – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी)**

दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृह येथे प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे मोटार वाहन विभाग आयोजित रस्ता सुरक्षित अभियान अंतर्गत क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन संपन्न झाले. यानिमित्ताने वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी आवाहन केले.

या कार्यक्रमास अप्पर परिवहन आयुक्त मुंबई श्री.भरत कळसकर, जिल्हा शल्यचिकित्सक कैलाश पवार, सहायक आयुक्त शैलेश कामत, प्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत पाटील, ठाणे जिल्हा दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष आनंद कांबळे व नितीन डोसा, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर व आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, प्रत्येक वर्षी जानेवारी महिन्यात हा कार्यक्रम होत असतो. आज राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन ठाणे जिल्हयात होत आहे, यानिमित्त उपस्थित सर्वांचे स्वागत आणि अभिनंदनही. वाहनचालकांनी नियमांचे पालन केले पाहिजे. परदेशात अपघाताचे प्रमाण का कमी आहे, याचा आपण अभ्यास करणे आवश्यक आहे.




परदेशात ठिकठिकाणी रिफ्लेक्टर्स लावले जातात, जागोजागी सूचना फलक लावले जातात. जेणेकरुन वाहन चालवित असताना वाहनचालकांना नेमके कुठे जायचे, याचा बोध होतो. या विभागाकडून वाहतूकीच्या निकषात अधिक सुधारणा केल्यास अपघातांचे प्रमाण कमी होण्यास निश्चित मदत होईल. वाहतुकीची शिस्त पाळणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. अपघात आणि मृत्यू प्रमाण कमी किंवा शून्य करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले जातील. यापुढे पार्किंग व्यवस्था नसेल तर नवीन वाहन नोंदणी केली जाणार नाही. यासाठी महापालिकेकडून भाडेतत्वावर नवीन वाहन पार्किंगसाठी मंजूरी मिळाली तर वाहन नोंदणी करणे शक्य होईल. यासाठी निकष व नियमांचे पालन करणे आवश्यकच आहे. तसेच प्रादेशिक परिवहन विभागानेही वाहनचालकांकडून नियमांचे उल्लघंन होणार नाही, याचीही काळजी घेतली पाहिजे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या शुभहस्ते दोन माहिती पुस्तिकांचेही प्रकाशन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना करताना प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांनी रस्ता सुरक्षा कार्यक्रम तसेच शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेबाबतची सविस्तर माहिती दिली. आभार प्रदर्शन करताना अप्पर परिवहन आयुक्त मुंबई भरत कळसकर यांनी सांगितले की, रस्ता सुरक्षा महत्वाची आहे. ट्रान्सपोर्ट वाहनांची संख्या वाढली आहे. रस्ता सुरक्षिततेसाठी सर्वांनी काळजी घेतली पाहिजे. गाडी चालविताना मोबाईल बंद ठेवावा, सीट बेल्टचा वापर करावा. दुचाकी वाहन चालविताना हेल्मेटचा वापर अवश्य करावा.

# मिनी मंत्रालयासाठी भाजपाची मोर्चे बांधणी

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी फुंकले रणशिंग





**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी)**

लोकसभेतील पराभवाचा कलंक भाजपाने भरघोस मतांआधारे धुवून काढला. विधानसभेतील संघाचे बौद्धिक भाजपाच्या कामी आले. मायक्रो प्लॅनिंग, लाडकी बहीण योजनेने अफाट असा विजय मिळवून दिला. या विराट दर्शनानंतर आता भाजपा स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी आतापासूनच मैदानात उतरली आहे. मिनी मंत्रालयासाठी भाजपाने आतापासूनच मोर्चे बांधणी सुरू केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी भाजपच्या महाविजय ३.० अभियानास उद्यापासून सुरुवात होत आहे. त्यामुळे मित्र पक्षांसह विरोधकांसाठी हा आलर्म आहे. मिनी मंत्रालयासाठी फुंकले रणशिंग राज्यातील मिनी मंत्रालयासाठी भाजपाने रणशिंग फुंकले आहे. भाजपच्या महाविजय ३.० अभियानास उद्यापासून सुरुवात होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज भाजपचे सर्व जिल्हाध्यक्ष, प्रदेश पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार आहेत. दुसऱ्या बैठकीत फडणवीस हे भाजपच्या सर्व आमदार व मंत्र्यांसोबत संवाद साधणार आहेत. मिनी मंत्रालयासाठी भाजपाने आतापासूनच तयारी सुरू केल्याने इतर पक्षांना पण आता बांधणी सुरू करावी लागणार आहे. उद्या शिर्डीत भाजपाचे राज्य अधिवेशन भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे उद्या अधिवेशनाच्या पहिल्या सत्राची सुरुवात करतील. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा हे निवडणुकीसाठी सर्व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतील. पहिल्या सत्राचा समारोप केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या भाषणाने होईल. दुसऱ्या सत्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कार्यकर्त्यांना कानमंत्र देतील. उद्या दिवसभर भाजप नेत्यांचे विचार मंथन होईल. अधिवेशनाचा समारोप हा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भाषणाने होईल. काय असेल या अधिवेशनात? विधानसभा निवडणुकीतील विजयाबद्दल महाराष्ट्रातील जनतेच्या अभिनंदनाचा प्रस्ताव पारित केला जाईल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक संदर्भात महाविजय ३.० ची घोषणा केली जाईल. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकण्यासाठी रणनिती आखली जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अभिनंदन प्रस्ताव संमत केला जाईल. स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी भाजपाने आतापासून मोर्चेबांधणी सुरू केली आहे. जिल्हा परिषद, महापालिका, पंचायत समितीपर्यंत भाजपाचा टक्का वाढवण्यावर भर देण्यात येत आहे. अर्थात ही निवडणूक सत्तेतील तीनही पक्ष स्वतंत्र लढतील की एकत्र लढतील हे समोर आलेले नाही.

# केंद्राकडून राज्यांना करपरतावा

## मुख्यमंत्र्यांकडून पंतप्रधान मोदींसह अर्थमंत्र्यांचे आभार

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ नवी दिल्ला(वृत्तसेवा)**

केंद्र सरकारनं देशातील सर्व राज्यांना करपरतावा जारी केला आहे.भांडवली खर्चाला गती देण्यासाठी, विकास आणि कल्याणाशी संबंधित खर्चांना वित्तपुरवठा करण्यासाठी केंद्र सरकारने राज्य सरकारांना या निधीचं वाट केलं आहे. केंद्राच्या अर्थ मंत्रालयाकडून याबाबत माहिती देण्यात आली आहे. केंद्रानं राज्यांना एकूण १ लाख ७३ हजार ०३० कोटी रुपयांचे कर हस्तांतरण केलं. महाराष्ट्राला १०९३०.३१ कोटी रुपयांचा निधी मिळाला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांचे आभार माणे आहेत.

केंद्र सरकारने काल राज्य सरकारांना त्यांच्याकडे जमा झालेल्या कराच्या रकमेतून





१ लाख ७३ हजार ०३० कोटी रुपयांचे कर हस्तांतरण जारी केले. डिसेंबर २०२४ मध्ये राज्य सरकारांना जारी करण्यात आलेले कर हस्तांतरण ८९,०८६ कोटी रुपये इतके होते.त्या तुलनेत जानेवारी महिन्यातील रकमेमध्ये मोठी वाढ करण्यात आली आहे.

केंद्रानं राज्यांच्या भांडवली खर्चाला गती देण्यासाठी, तसेच विकास आणि कल्याणाशी संबंधित खर्चाला वित्तपुरवठा करण्यास राज्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने या महिन्यात अधिक रक्कम हस्तांतरित केली जात असल्याची माहिती दिली.

सर्वाधिक निधी उत्तरप्रदेशला केंद्र सरकारनं जारी केलेल्या निधीपैकी सर्वाधिक निधी उत्तर प्रदेशला देण्यात आला आहे. उत्तर प्रदेशला ३१०३९.८४ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. त्या पाठोपाठ बिहारचा नंबर येतो. बिहारला १७४०३.३६ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. मध्य प्रदेशला १३५८२.५६ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. यानंतर महाराष्ट्राचा क्रमांक येतो, राज्याला १०९३०.३१ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. महाराष्ट्रापाठोपाठ राजस्थानला देखील चांगला निधी मिळाला आहे. राज्यस्थानला १०४२६.७८ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पंतप्रधान, अर्थमंत्र्यांचे आभार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राला केंद्र सरकारकडून देण्यात आलेल्या करपरताव्यासंदर्भात आभार मानले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना मनापासून धन्यवाद देतो असं म्हटलं आहे. महाराष्ट्राला १०९३०.३१ कोटी रुपयांचा निधी दिल्याबद्दल आभार मानत असल्याचं ते म्हणाले. यामुळं आमच्या महाराष्ट्रातील लोकांच्या विकासाच्या प्रयत्नांना यामुळं बळ मिळेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात अन् मार्गदर्शनात महाराष्ट्राच्या विकासाचं काम सुरु राहील,असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# मुंबईकरांनी मोठया संख्येने म्हसा यात्रेला भेट द्यावी : आमदार किसन कथोरे

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/मुरबाड(प्रतिनिधी)**

मुरबाड तालुक्यातील म्हसा या गावातील अतिप्राचीन म्हसोबा यात्रेला यंदा सोमवार, दि. १३ जानेवारीपासून प्रारंभ होत आहे. संपूर्ण राज्यात पशुधनाच्या विक्रीसाठी सुप्रसिद्ध असणाऱ्या या यात्रेत महाराष्ट्रासह कर्नाटक, गुजरात आणि मध्य प्रदेशमधून भाविक मोठ्या संख्येने दाखल होतात. मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे हे दरवर्षी या यात्रेचे पालकत्व स्वीकारून यात्रेचे आयोजन यशस्वी करण्यासाठी फार मेहनत घेतात. त्यानिमित्ताने म्हसोबा यात्रेबाबत आमदार किसन कथोरे यांच्याशी संवाद साधला असता, त्यांनी मुंबईकरांनी या यात्रेस आवर्जून भेट देण्याचे आवाहन केले.



मुरबाडच्या म्हसा यात्रेला वर्षानुवर्षांची परंपरा लाभली आहे. तेव्हा, या यात्रेच्या परंपरेविषयी काय सांगाल? मुरबाड शहरापासून दहा किमी अंतरावर कर्जत रस्त्यावर म्हसा हे गाव आहे. या गावात म्हसोबा देवाचे प्राचीन मंदिर आहे. या देवस्थानावरूनच या गावास 'म्हसा' हे नाव प्राप्त झाले. गेली अनेक वर्षे पौष पौर्णिमेला येथे म्हसोबा मंदिराच्या परिसरात भव्य-दिव्य अशी यात्रा भरते. महाराष्ट्रातील सर्वात मोठी यात्रा म्हणून ही यात्रा नावारुपास आली आहे. या यात्रेत फार मोठ्या प्रमाणात पशुधनाची विक्री होते, तसेच कुटुंबात लागणाऱ्या सर्व चीजवस्तू येथेच खरेदी केल्या जातात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच कर्नाटक, गुजरात, मध्य प्रदेश येथूनही हजारो भाविक या यात्रेत सहभागी होतात. नवविवाहित जोडपी त्यांनी केलेले नवस फेडण्यासाठी येथे श्रद्धेने येतात. यामुळे 'नवसाला पावणारा म्हसोबा' अशी या यात्रेची विशेष ओळख आहे. आपण सांगितले तसे, विविध प्रकारच्या पशुधनाची विक्री हे या यात्रेचे खास वैशिष्ट्य आहे. त्याबद्दल काय सांगाल? आपल्याला कधीही पाहायला न मिळालेल्या खिल्लारी बैलजोड्या म्हसा यात्रेत पाहायला मिळतात. बैलगाडी, शेतीची कामे आणि हौसमौजेसाठी बैल घेणाऱ्यांची मोठी गर्दी येथे दरवर्षीच होते. शेतकरीवर्गदेखील शेतीसाठी लागणारे बैल येथून खरेदी करतात. लाखो रुपयांची बोली लागते आणि ढोल-ताशांच्या गजरात, अगदी गुलालाची उधळण करत खरेदीदार आपल्या आवडीची जनावरे घेऊन जातात. ही यात्रा दोन आठवडे चालते. पण, त्यानंतरही इतर बाजार येथे चालू असतो. घरगुती खरेदीसाठी ग्रामीण भागातील महिला याठिकाणी येतात. या यात्रेतून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतो. त्यांचा फायदा मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागाला होतो.

म्हसा यात्रेदरम्यान भाविकांसाठी प्रशासनातर्फे कोणकोणत्या सुविधा पुरविल्या जातात? या यात्रेत लाखोंच्या संख्येने भाविक सहभागी होत असतात. त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेचे मोठे आव्हान असते. स्थानिक नळयोजना, गावाच्या परिसरात विविध ठिकाणी बोअरवेल च्या माध्यमातून हातपंपाद्वारे आणि स्थानिक विहिरींच्या माध्यमातून कोणालाही पाणी कमी पडणार नाही, याची दक्षता जिल्हा प्रशासनाकडून घेतली जाते. आरोग्याची कोणतीही समस्या आल्यास तत्काळ दवाखाने, रुग्णवाहिका, ग्रामीण रुग्णालय अशी चोख व्यवस्था केली जाते. यात्रेत कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस बंदोबस्त, गस्तपथके आदी व्यवस्था उत्तमपणे आपले काम बजावते. बाहेरगावाहून विक्रीस येणाऱ्या जनावरांचे लसीकरण केले जाते, जेणेकरून त्यामार्फत होणाऱ्या रोगराईस प्रतिबंध केला जातो. 'एमएसईबी'कडून वीजपुरवठ्याचेही एक मोठे आव्हान असते. पण, सगळीकडे विद्युत पुरवठा होईल, याची कटाक्षाने काळजी घेतली जाते. या काळात दारुबंदीवर भर दिला जातो. महिलांना त्रास होऊ नये, याकडे विशेष लक्ष दिले जाते. स्थानिक आमदार या नात्याने यात्रेच्या आयोजनात आपण कोणते खास प्रयत्न करता? सध्या येथील जिल्हा प्रशासनावर प्रशासक असल्यामुळे आमदार या नात्याने यात्रेच्या आयोजनाची जबाबदारी मी स्वतः घेत असतो. ग्रामस्थ मंडळींबरोबर नेटक्या आयोजनासाठी बैठका घेणे, सर्व प्रशासकीय व्यवस्थांचा आढावा घेणे, संबंधित विभागांना सूचना देऊन त्यांच्याकडून कामे करून घेण्यावर माझे अधिक लक्ष असते. यात्रेच्या काळात येथे नियमित भेट देणे तसेच दररोज सर्व कामकाजाचा आढावा घेणे, अशी महत्त्वाची जबाबदारी आम्ही पार पाडत असतो.

# गीतासार



तत्रापश्यत्स्थितान पार्थः
पितृनथ पितामहान ।
आचार्यान्मातुलानभ्रातृन
पुत्रान पौत्रान सखींस्तथा
। १-२६ ।
श्वशुरान सुहृदश्चैव
सेनयोरुभयोरपि

**अर्थ**

त्यानंतर पार्थाने (अर्थात पृथापुत्र अर्जुनाने) त्या दोन्ही सैन्यांमध्ये असलेल्या काका, आजे-पणजे, गुरू, मामा, भाऊ, मुलगे, नातू, मित्र, सासरे आणि हितचिंतक यांनाच पाहिले. । १-२६, १-२७(पूर्वार्ध) ।

तान समीक्ष्य स कौन्तेयः सर्वान
बन्धूनवस्थितान । १-२७ ।
कृपया परयाविष्टो
विषीदन्निदमब्रवीत ।

**अर्थ**

तेथे असलेल्या त्या सर्व बांधवांना पाहून अत्यंत करुणेने व्याप्त झालेला कुंतीपुत्र अर्जुन शोकाकुल होऊन असे म्हणाला ।१-२७(उत्तरार्ध), १-२८(पूर्वार्ध) ।

अर्जुन उवाच
दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं
समुपस्थितम् । १-२८ ।
सीदन्ति मम गात्राणि मुखंच
परिशुष्यति ।
वेपुथश्च शरीरे मे रोमहर्षश्च
जायते । १-२९ ।

**अर्थ**


अर्जुन म्हणाला, हे कृष्णा, युद्धाच्या इच्छेने रणांगणावर उपस्थित असणाऱ्या या स्वजनांना पाहून माझे अवयव गळून जात आहेत; तोंडाला कोरड पडली आहे; शरीराला कंप सुटला आहे आणि अंगावर रोमांच उभे राहात आहेत.।१-२८(उत्तरार्ध), १-२९ ।

# स्वामी विवेकानंद जयंती/राष्ट्रीय युवक दिन

सर्वधर्माच्या उदात्त तत्त्वांचा समावेश असलेल्या व्यापक विश्व धर्माचा पुरस्कार स्वामी विवेकानंदांनी केला .हा धर्म मानव सेवेशी निगडित होता. नैतिक मूल्ये हाच खरा धर्म असे ते मानत .असा धर्म म्हणजे राष्ट्र देहाचं रक्त आहे. पण कर्मकांड, अंधश्रद्धा, अन्यायजन्य रुढी यांनी हे रक्त दूषित झाला आहे ,हे रक्त शुद्ध करून बलशाली राष्ट्र उभारण्याचे आवाहन ज्यांनी केलं त्यांचा परिचय करून घेणे आवश्यक आहे. भारतातला हिंदू धर्मात वरच्या वर्णातील लोक खालच्या वर्णाला शूद्र लेखुन अस्पृश्यांना अत्यंत हीन दर्जाची वागणूक देत होते .हिंदू धर्मातल्या अनिष्ट गोष्टींना विरोध करून सर्वधर्माच्या उदात्त तत्त्वांचा समावेश असलेल्या व्यापक विश्व धर्माचा पुरस्कार करण्याचे महत्त्व ज्या महामानवाने विषद केले, त्यांचे जीवन अभ्यासणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे असे मला ठामपणे येथे नमूद करावेसे वाटते.

विवेकानंद यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ विश्वनाथ दत्त असे होते. त्यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी झाला त्याच्या वडिलांचे नाव विश्वनाथ बाबू दत्त आणि आईचे नाव भुवनेश्वर देवी असे होते. शाळेत असताना अतिशय बुद्धिमान विद्यार्थी म्हणून त्यांची ख्याती होती.जनरल असेम्ब्ली महाविद्यालयात शिकत असताना भारतीय व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचे त्यांनी चिंतन केले होते. कॉलेजात शिकत असताना लेखनाची त्यांना विशेष आवड होती .त्या काळात त्यांनी सात आठ इंग्रजी कविताही रचल्या होत्या. 'भारतीय वाद्यम' या विषयावर बंगालीत त्यांनी एक पुस्तक लिहिलं होतं. 'पूर्व आणि पश्चिम' या विषयावर एका बंगाली मासिकासाठी त्यांनी लेखमाला लिहिली.' दोन्ही संस्कृतींचा तुलनात्मक परामर्श घेणाऱ्या या लेखमालेतील सुबोध व अर्थवाही शैलीने बंगाली गद्यास नवीन वळण लावलं' अशा शब्दात रवींद्र टागोरांनी त्यांच्या शैलीचा गौरव केला आहे.

विवेकानंदांनी १६८१ साली नोव्हेंबर मध्ये रामकृष्ण परमहंस यांची भेट घेतली. रामकृष्ण परमहंस यांच्या सहवासात ते साडेपाच वर्ष राहिले .परमहंस यांनी त्यांना संन्यास दीक्षा दिली. त्यांना ईश्वराची प्रत्यक्ष अनुभूती प्राप्त करून दिली आणि त्यांचे नाव' स्वामी विवेकानंद' असे ठेवण्यात आले ईश्वराची प्रत्यक्ष अनुभूती आल्यामुळे त्यांचे सारे जीवन बदलून गेले होते. विवेकानंदांना अमेरिकेतील शिकागो इथे भरलेल्या विश्वधर्म परिषदेला उपस्थित राहण्याची संधी मिळाली. ११ सप्टेंबर १८९३ ला सुरू झालेल्या शिकागोच्या विश्वधर्म परिषदेत आपल्या भाषणास सुरुवात करताना' सभ्य स्त्री पुरुष हो 'अस पाश्चात्त्य पद्धतीने स्रोत्यांना ना न संबोधता बंधुभावाची शिकवण देणाऱ्या 'बंधू भगिनींनो' या संबोधना ने सुरुवात करून श्रोत्यांची मने त्यांनी जिंकली .हिंदू धर्माचे प्रतिनिधी म्हणून ते बोलले तरी हिंदू धर्मच सर्वश्रेष्ठ अस प्रतिपादन त्यांनी केलं नाही, तर व्यापक विश्व धर्माचे विवेचन केलं. विवेकानंदांनी तिथे अकरा भाषण केली. एका भाषणाच शीर्षक होतं 'भारताची तातडीची गरज धर्म नव्हे ;भूक भागविणार अन्न आहे!' एका भाषणात सनातन्यांचा हिंदू धर्म आणि भारतातील आधुनिक धर्म यातील भेदाच विवेचन त्यांनी केलं. वेदप्रामाण्य नाकारलं नाही पण त्यांनी विशद केलेला आशय नवीन होता.' जातपात पाळण ,अंधश्रद्धा जोपासणे, ढोंग करणं, निर्दयपणे चालू असलेल्या विषमतेचा समर्थन करणं यात धर्माचा आशय साठवलेला आहे काय?' असा प्रश्न उपस्थित करून' धर्म चालीरीतीत नाही तर अंःतकरणपूर्वक प्रेम करणं, वैश्विक एकात्मता साधण हाच खरा धर्म आहे' असे प्रतिपादन त्यांनी केले.



स्वामी विवेकानंदांनी १८९६ मध्ये दुसऱ्यांदा अमेरिकेचा दौरा केला .'दरिद्री नारायण' हा शब्द विवेकानंदांनी आपल्या भाषणात प्रथम वापरला.' दरिद्री नारायणाची सेवा सहिष्णुता व शांतता यावर अधिष्ठित आंतरराष्ट्रीय बंधुभाव हाच खऱ्या धर्माचा आधार आहे व्यसनमुक्त, शोषणमुक्त ,भयमुक्त समाज घडवणं हेच आपलं आद्य कर्तव्य आहे, 'असं प्रतिपादन त्यांनी केलं. विशेष म्हणजे स्वामी रामकृष्णांच्या आदेशानुसार संन्यास व्रत स्वीकारून त्यांनी १८९७ मध्ये कलकत्त्यात रामकृष्ण संघाची स्थापना केली . त्यांनी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस संन्याशांचे संघ स्थापनेचे कार्य सुरू केलं. या संघाच्या रामकृष्ण मठ आणि रामकृष्ण मिशन अशा दोन प्रमुख शाखा असून मठात आध्यात्मिक कार्य चालतं, तर मिशनमार्फत रुग्णसेवा, शिक्षणसंस्था, ग्रंथ प्रकाशन, आपत्कालीन सेवा अशी काम चालतात. स्वामी विवेकानंदांना अतिशय कमी आयुष्य लाभलं तरी त्यांच्या कार्याचा ठसा विसाव्या शतकावर कायम राहिला.

**युवाशक्ती हीच राष्ट्र शक्ती..**

आपल्या देशात स्वामी विवेकानंदांचा जन्मदिवस , 'राष्ट्रीय युवक दिन 'म्हणून साजरा केला जातो . कोणत्याही देशात युवाशक्तीच इतिहास घडवू शकते .स्वामी विवेकानंदांच्या मते युवक हे देशाचे आधारस्तंभ आहेत . युवाशक्ती हीच राष्ट्र शक्ती आहे . आजचा युवक सुसंस्कृत, सुशिक्षित व सर्व नैतिक मूल्यांची जपणूक करणारा असावा .आज आपण युवकदिन साजरा करीत आहोत . धन्य ती स्वातंत्र्य प्रेमाने भारलेली स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी ची पीढी ! १९४७ पूर्वी युवक राष्ट्र प्रेमाने पेटून उठले होते . त्यांच्या नसानसात राष्ट्रप्रेम भरले होते . म्हणूनच देशाला ब्रिटिशांच्या तावडीतून ते मुक्त करू शकले .आजच्या युवकांमध्ये राष्ट्र प्रेमाची रुजवण झाली आहे का? आजची युवाशक्ती मोबाईल व दूरदर्शनच्या आहारी गेली आहे . व्यसनाधीन बनली आहे . आजच्या युवकांपुढे आदर्श शिल्लक आहेत का? हा प्रश्न आहे . आदर्शाची घसरण झाली आहे . स्वात्रंत्र्यापूर्वी स्वामी विवेकानंद यांचेसह वीर सावरकर, मदनलाल , भगतसिंग यांसारख्या विभूतींनी आपले सर्वस्व अर्पण केले , असे दिसते . आज तरुणांचे आदर्श आहेत डांसर, नट व नट्या . दारू . पिऊन झिंगणारा व गुन्हे करणारा तरुण आदर्श युवक कसा असेल ?तो कसा देश घडवेल ?आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे . देशातील युवकांकडून विधायक कार्ये घडोत! देश बलसंपन्न होवो , हीच सदिच्छा !!

**डॉ. आनंदराव सूर्यवंशी**

## आजचे राशीभविष्य

**मेष**
कामात घाई गडबड करू नका. आजचा दिवस शुभ आहे. दिवसभर धावपळ करावी लागेल. कार्यक्षेत्रातील बदल आपल्यासाठी सकारात्मक असेल.

**वृषभ**
उत्तम वर्तनाने सर्वांना आपलेसे करून घ्याल.घरातील कामे वेळेवर आटोपती घ्या. मनाची चलबिचलता जाणवेल. करमणुकीकडे कल वाढेल.

**मिथुन**
हातातील कामात यश येईल. प्रिय व्यक्तीच्या भेटीने मन आनंदी होईल. कामातील अपेक्षितता वाढेल. मनातील इच्छा पूर्ण होईल.

**कर्क**
मौल्यवान वस्तु खरेदी कराल. दिवस चांगला जाईल. घरातील वातावरण प्रसन्न राहील.उधारी वसूल व्हायला सुरुवात होईल.

**सिंह**
धनवृद्धीचे योग जुळून येतील. व्यावसायिक योजनांना बळ मिळेल. भावनेच्या भरात निर्णय घेऊ नका. सारासार विचार करावा.

**कन्या**
बोलताना आक्रमक शब्द वापरू नका. जुनी कामे विनासायास पूर्ण होतील. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. आहारावर विशेष नियंत्रण ठेवा.

**तूळ**
बाहेरील पदार्थ खाणे टाळावे. खर्च समाधानकारक असेल. मानसिक शांतता लाभेल. विरोधक नामोहरम होतील. वैवाहिक जीवन संमिश्र राहील.

**वृश्चिक**
काही गोष्टी जुळवून घ्याव्या लागतील. एखादी गोष्ट संभ्रमित करू शकते. मित्राचा सल्ला घ्याल. मत मांडताना थोडासा विचार करावा.

**धनु**
काही गोष्टी लपवण्याकडे कल राहील. जोडीदाराचे उत्तम सान्निध्य लाभेल. झोपेची तक्रार जाणवेल. संयमाने परिस्थिती हाताळावी लागेल.

**मकर**
आर्थिक स्थिती चांगली राहील. बोलताना तारतम्य बाळगावे लागेल. रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. घरासाठी खरेदी केली जाईल. आनंदाची अनुभूति घ्याल.

**कुंभ**
सांसारिक सौख्यात वाढ होईल. मानसिक शांतता लाभेल. भावंडांशी स्नेहभाव वाढेल. अचानक उद्भवणाया खर्चावर आळा घालावा.

**मीन**
घरात तुमच्या शब्दाला महत्त्व मिळेल. गोड बोलून कामे करून घ्याल. वाहन विषयक कामे निघतील. फ्क्रार गरज नसेल तर प्रवास टाळावा.

## आरोग्य टिप्स

### स्प्राऊट खा अल्पावधीत तंदुरुस्त व्हाल



**चण्याचे स्प्राउट्स**

डाळींऐवजी तुम्ही नाश्त्यात चण्याच्या स्प्राऊट्सचे समावेश करू शकतात. कारण चण्याचे स्प्राऊट्स प्रथिनांचा एक उत्कृष्ट स्त्रोत देखील आहे. याशिवाय चण्याच्या स्प्राउट्समध्ये लोह, फायबर, पोटॅशियम इत्यादी पोषक घटक भरपूर प्रमाणात असतात. चणा स्प्राउट्समध्ये लिंबाचा रस व थोडे मीठ आणि मिरपूड टाकल्यास चव दुप्पट होते.

**शेंगदाणे स्प्राउट्स**

अनेकजण वजन कमी करण्यासाठी त्याच्या आहारात प्रथिनांसाठी बाजारात उपलब्ध असलेले पीनट बटरचे अधिक सेवन करतात. परंतु बाजारात मिळणाऱ्या पीनट बटरमध्ये अस्वास्थ्यकर फॅट असते आणि बरेच प्रिजर्वेटिव घटक देखील असतात, ज्यामुळे फायद्याऐवजी आरोग्यास हानी पोहोचू शकते. म्हणूनच तुमच्या आहारात पीनट स्प्राउट्सचा समावेश करणे हा एक वजन नियंत्रित करण्यासाठी चांगला पर्याय आहे.

**हिवाळयात बनवा या धान्याचे स्प्राऊट**

थंडीच्या दिवसात बाजरीचे सेवन भरपूर परमनंट केले जातात. कारण बाजरीच्या सेवनाने शरीर आतून उबदार राहते. यासाठी जी लोक डाएट करत आहेत त्यांनी बाजरीचे स्प्राउट्स आहारात समाविष्ट करून घेऊ शकतात. हे एक गरम धान्य असले तरी यात प्रथिने, फायबर आणि बऱ्याच पोषक तत्वांनी समृद्ध आहे. हे आतड्याचे आरोग्य सुधारते .

## २२६ वर्षांची परंपरा लाभलेल्या

# म्हसोबाच्या यात्रेसाठी प्रशासन यंत्रणा सज्ज



संपूर्ण महाराष्ट्रभर सुप्रसिद्ध असणारी मुरबाड तालुक्यातील म्हसा यात्रेची लगबग सुरू झाली असून प्रशासन यंत्रणा सज्ज झाली आहे. नवसाला पावणारे देवस्थान म्हणून खांबलिंगेश्वर म्हसोबा प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रासह अन्य राज्यातील लाखो भाविकांचे हे मानाचे श्रद्धास्थान आहे. म्हसा यात्रेच्या पार्श्वभूमीवर म्हसा ग्रामपंचायत, खांबलिंगेश्वर देवस्थान ट्रस्ट, महसूल प्रशासन, आरोग्य विभाग, पोलीस प्रशासन यांची संयुक्त आढावा बैठक आमदार किसन कथोरे यांच्या वतीने घेण्यात आली आहे.

पौष पौर्णिमा आली की मुरबाड तालुक्याला वेध लागतात म्हसा यात्रेचे. म्हसा हे ठाणे जिल्ह्याच्या मुरबाडपासून अवघ्या १० किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावात म्हसोबाचे (भगवान शंकराचे) प्राचीन मंदीर आहे, या मंदीरावरून गावास म्हसा हे नाव पडले. या पंचक्रोशीतील भाविक म्हसोबा आणि खांबलिंगेश्वराच्या दर्शनाला येतात. या यात्रेला दोनशे वर्षा पेक्षा जास्त वर्षांची परंपरा आहे ३ ते ४ किलोमीटर परिसरामध्ये ही यात्रा भरते. या यात्रेत फक्त राज्यातून नव्हे तर इतर राज्यातूनही लाखो भाविक हजेरी लावतात.

**लाखों रुपयांची उलाढाल**

जवळपास १० ते १५ दिवस चालणाऱ्या या यात्रेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजेच यात्रेत भरणारा बैलांचा बाजार. अनेक जनावरं या यात्रेत विक्रीसाठी आणली जातात. बैलाची जात रंग आणि वयानुसार त्यांच्या किमती ठरतात गुलाल उधळून बैलांचा व्यवहार होतो. पंधरा दिवसात या बैलांची उलाढाल एक कोटीहून जास्त रुपयांची होते . या यात्रेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इथला टोपली बाजार. बांबूच्या टोपली बनवणारे आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या यात्रेला हजेरी लावतात. या बाजारात टोपल्यांची मोठी उलाढाल होते. लहान मोठ्या आकारांच्या टोपल्या, करंडे येथे मिळतात. तसेच उखळ शेतीसाठी लागणारी अवजारे आणि घरगुती वापराच्या वस्तू या बाजारात मिळतात. मेंढीच्या लोकरी पासून बनवलेल्या अस्सल घोंगड्या हे या यात्रेचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. विणलेल्या आणि लाटीव अशा दोन प्रकारच्या घोंगड्या येथे मिळतात. करमणुकीचे खेळ, आकाश पाळणे, खाऊ खेळणी चे दुकानं यांची रेलचेल येथे असते. म्हसा यात्रेत हातोली, खाजे ,गुलाबजामुन फार फेमस आहेत .दूरवरून ही मिठाई घेण्यासाठी लोक बाजारात येतात. रात्रीही या यात्रेची रंगत काही औरच असते काही लोक यात्रेला मुक्कामी येतात. तंबू ठोकून राहतात आणि यात्रेतच चुल करून जेवून जातात. शहरी गजबजाटापासून दूर भरणाऱ्या या यात्रेत एक वेगळाच आनंद मिळतो.

म्हसा ग्रामपंचायत प्रशासन सज्ज

१३ जानेवारी २०२५ पासून सुरू होत असलेल्या या यात्रे साठी म्हसा पंचायतीने जय्यत तयारी केली आहे. येणाऱ्या सर्व भाविकां साठी पिण्याच्या शुद्ध पाण्यासाठी व्यवस्था. लाईटची सुविधा , संपुर्ण यात्रा परीसरात १६ C.C.T.V. कॅमेरे बसवले जाणात आहेत. १० ठिकाणी फिरते प्रसाधनगृहे बसवले जाणार आहेत. यात्रेत स्वच्छते वर विशेष भर देण्यात येणार असल्याची माहीती सरपंच सौ. जया घागस यांनी दिली. दररोज औषध फवारणी, डास धुराची फवारणी केली जाणार आहे. सतत ओल सर असणाऱ्या जागेवर TCL पावडर टाकण्यात येणार आहे. यात्रेत जवळपास १५० LED व १५० मोठे इलेक्ट्रिक दीवे लावण्यात येत आहेत. रोज साफ सफाई केली जाणार आहे. तात्पुरत्या स्वरूपात पोलीस स्टेशन उभारण्यात आले आहे. रोज कचरा व्यवस्थापन करण्यासाठी घंटा गाडी लावन्यात येणार आहे.

आपत्कालीन आगीवर नियंत्रण मिळवण्या साठी अग्नीशमन दलाचे बंब रोज तैनात असतील. भाविकांच्या आरोग्याची ही विशेष काळजी घेण्यात येत आहे. म्हसा उपकेंद्रात विशेष कक्ष उभारण्यात आला आहे येथे २४ तास रोज डॉक्टर उपलब्ध राहणार आहेत.

# या पदार्थांचा जेवणात वापर करून आजारांना करा हद्दपार

बदलत्या जीवनशैलीत फिटनेस चांगला राखणं हे सर्वात महत्त्वाचं काम आहे. स्थूलता, लठ्ठपणा, उच्च- रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह, प्रतिकार शक्ती कमी असल्यामुळं होणारे आजार, पचनसंस्थेचे आजार, कॅन्सर या आजारांचं प्रमाण वाढत आहे. या सर्व आजारांचा प्रतिकार करण्यासाठी, त्यांना रोखण्यासाठी आपल्या देशातील पारंपारिक तृणधान्यं आणि भरडधान्य (मिलेट) उपयोगाची आहेत, असं मत पुण्यातील या विषयाच्या अभ्यासक संगिता संजय कुमार यांनी दिलं आहे. त्यांनी याबाबत काही महत्त्वाच्या टिप्सही दिल्यात. मिलेट म्हणजे काय? मिलेट हा प्राचीन धान्याचा एक प्रकार आहे. जो दोन प्रकारच्या धान्यांपासून बनविला जातो. अनेकांना मिलेट म्हंटलं की बाजरीची आठवण येते. हा मिलेटमधील सर्वात लोकप्रिय प्रकार आहे. भारत, नायजेरिया मिलेट चा संबंध बाजरीचा असल्याचा आठवतो, जो मिलेट मध्ये सर्वात लोकप्रिय आहे.मिलेट हे भारतसह आशियाई आणि आफ्रिकन देशांमध्ये याचं उत्पादन होतं.

बाजरीचे धान्य रक्तदाब कमी करू शकते आणि गॅस्ट्रिक अल्सर आणि पोटाचा कर्करोग टाळू शकते. बाजरी बद्धकोष्ठता, सूज आणि लठ्ठपणा कमी करण्यास देखील मदत करू शकते मिलेट हे एक पौष्टिक पीक आहे, डोंगराळ, किनारी, पावसावर अवलंबून आणि कोरड्या भागात त्याचे उत्पादन घेता येते. जमिनीची मर्यादित सुपीकता किंवा वनस्पतींची वाढ टिकवून ठेवण्याची मातीची क्षमता आणि जमिनीतील ओलाव्याची श्रेणी लक्षात घेऊन ही धान्ये त्यात सहज उगवतात. ज्यात भरड आणि सूक्ष्म धान्यांचा समावेश केला जातो. बाजरीसह नाचणी, बाजरी, झांगोरा, ज्वारी, कोडो, बेरी, चेना, कांगणी, कुटकी, मूग, इतर धान्यांचाही मिलेटमध्ये समावेश होतो, अशी माहिती संगिता यांनी दिली. मिलेट्सचे मुख्य प्रकार कोडो मिलेट्स (कोद्रा) हा एक महत्तावाचा औषधी पदार्थ आहे. हे अँटिऑक्सिडंट्सचे उत्कृष्ट स्त्रोत आहे. रक्तातल्या साखरेची पातळी नियंत्रित करण्याच्या क्षमतेसाठी हे ओळखले जाते. कोडो मिलेट्सला सौम्य, मातीची चव असते आणि ती उपमा आणि खिचडीसह विविध पदार्थांमध्ये वापरली जाऊ शकते. महिलांनो, चाळीसीनंतरही सुदृढ राहण्यासाठी आहारात करा 'या' गोष्टींचा समावेश लहान मिलेट, ज्याला मराठीमध्ये 'सवा, वरी किंवा हलवी' देखील म्हणतात, हा एक प्रकारचा लहान-बिया असलेला मिलेटचा प्रकार आहे. या मिलेट्सचे दाणे हलके पिवळसर रंगाचे लहान आणि गोल असतात. ते अत्यंत पौष्टिक आणि ग्लूटेन-मुक्त असतात. ती भातासारखीच शिजवता येतात. त्याचबरोबर दलिया, उपमा, खिचडी आणि अगदी भाजलेल्या पदार्थांमध्येही वापरली जाऊ शकते. हे फायबर, प्रथिने आणि आवश्यक खनिजांनी समृद्ध आहे, ज्यामुळे ते संतुलित आणि निरोगी आहारासाठी उपयुक्त आहे. मिलेट्स म्हणजे भरड धान्यामध्ये पोषक तत्वे मुबलक प्रमाणात आढळतात. ते फायबरने समृद्ध असतात आणि त्यात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स, फॉस्फरस, पोटॅशियम, लोह, तांबे आणि मॅग्नेशियम हे धान्य रक्तपेशी बनवण्यातही मदत करतात, अशी माहिती संगिता यांनी दिली.

## तेथे कर माझे जुळती

# सूर्यकुमार सेन स्मृतिदिन

**( २२ मार्च १८९४– १२ जानेवारी १९३४)**

वधस्तंभाकडे नेतांनाही 'वंदे मातरम् ' घोषणा देणाऱ्या व ब्रिटीशांच्या विरोधात क्रांतिकार्य करणाऱ्या सूर्यसेन यांच्या स्मृतिदिना निमित त्यांचा परिचय करून घेऊ या . बंगालमधील चितगाव जिल्ह्यातील नोआपारा येथे सूर्यकुमार सेन यांचा दिनांक २२ मार्च १९९४ रोजी जन्म झाला . (आता चितगाव बांगला देशात आहे.) त्यांच्या वडिलांचे नाव रामनिरंजन सेन व आईचे नाव शिला बाला देवी असे होते. सन१९१६ मध्ये ते बेहरामपूर कॉलेज (आताचे एमईएस कॉलेज ) येथून बीए झाले होते .

महाविद्यालयात असतांना त्यांच्या मनावर राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव पडला होता . महाविद्यालयीन शिक्षण घेतांना त्यांची क्रांतिकारी अध्यापक सतीशचंद्र चक्रवर्ती यांच्याशी गाठ पडली. ' युगांतर ' या क्रांतिकारी संस्थेचे ते सदस्य होते . चक्रवर्ती यांच्या सहवासात प्रेरित होऊन सूर्यकुमार सेन क्रांतिकारी बनले . पुढे १९१७ साली बी . ए .झाल्यानंतर सूर्यकुमार उमा तारा हायस्कूल येथे गणिताचा शिक्षक म्हणून काम करू लागले . दरम्यान पुष्पा सेन यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांच्या मनात केवळ क्रांतिचेच विचार होते .त्यामुळे घर-संसार या गोष्टी त्यांना तुच्छ वाटत होत्या .

सन१९१९ मध्ये घडलेल्या जालियनवाला बाग हत्याकांडाची बातमी सर्वत्र पसरली . सदर हत्याकांडाचा जाहीर निषेध करण्याचे



सूर्यकुमार यांनी ठरविले . त्यांनी उघड -उघड सत्याग्रह हा मार्ग पत्करला . क्रांतिकारी कार्यात चितगाव येथे तैनात असलेल्या ब्रिटिश सैन्याविरुद्ध त्यांनी लढा दिला. असहकार चळवळीत त्यांनी विद्यार्थ्यांची गुप्त समिती स्थापन केली होती. त्या समितीचे नाव साम्यावस्था असे होते. सक्रीय सहभागी होऊन लढा दिला. म्हणून १९२६ ते १९२८ पर्यंत वर्षे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला.

चितगावच्या छाप्यानंतर १८ एप्रिल १९३० रोजी एका भयंकर युद्धात सूर्यसेन यांनी ब्रिटीश सरकारी कर्मचारी व मालमतेवर हल्ले केले. त्यांचा शस्त्र साठा पळविला. पोलिसांना ते गुंगारा देऊन क्रांतिकार्य करीत असत . ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर १४००० रुपयांचे इनाम जाहीर केले. सतत ४ वर्षे सूर्यकुमार पळत राहिले. पोलीस सतत त्यांचा पाठलाग करत होते. शेवटी लष्करी फौज त्यांना शोधण्यासाठी पाठविण्यात आली. एकूण दहा वेळा पोलिसांच्या तावडीतून निसटणाऱ्या सेनमास्टर दा यांना एका विश्वास घातकी नराधमाने पकडून दिले. १६ फेब्रुवारी १९३३ रोजी त्यांना अटक करण्यात आली. त्यांचे सहकारीही पकडले गेले . खटला चालवण्यात आला . शेवटी त्यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली . त्यांच्या फाशीची वेळ ब्रिटीश सरकारने रात्री बाराची ठेवली . 'वंदे मातरम् 'घोषणा देतो म्हणून इंग्रजांनी त्यांचा जबडा तोडला आणि हाताची नखेही उपटली. सूर्यसेन यांनीअत्याचार सहन केले. ब्रिटिशांनी निर्दयतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या . अभिमानाची बाब म्हणजे हा क्रांतिसूर्य त्यांना शरण गेला नाही . पोलिसांनी मास्टरदा सूर्यसेन यांना फाशीसाठी नेतांना देखील लाथा बुक्क्यांनी ते बेशुद्ध पडेपर्यंत मारले . त्याच अवस्थेत त्यांना फाशी देण्यात आली . तो दिवस होता १२ जानेवारी १९३४ चा !धन्य तो हुतात्मा !!



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

# ‘HMPV विषाणुपासुन बचाव करण्यासाठी केडीएमसीच्या सूचना

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत केडीएमसी कार्यक्षेत्रातील जनतेला सुचित करण्यांत येते की, चीनमध्ये असलेला विषाणु एचएमपीव्ही तीव्र श्वसन संसर्गाचे एक प्रमुख कारण आहे. मानवी मेटान्युमोव्हायरस (एचएमपीव्ही) हा एक सामान्य श्वसन विषाणु आहे. ज्यामुळे श्वसन मार्गातील संसर्गास (सर्दीसारख्या) कारणीभुत ठरते. हा एक हंगामी आजार आहे. जो सामान्यतः आरएसव्ही आणि फ्ल्यु प्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळयाच्या सुरुवातीला उद्भवतो.

संक्रमित लोकांच्या संपर्कात आल्याने संसर्ग वेगाने पसरु शकतो. संसर्गाचा कालावधी ३ ते ५ दिवसाचा आहे. लहान मुले, वृध्द आणि प्रतिकारशक्ती कमी असलेल्या व्यक्तींना लवकर संसर्ग होतो. याबाबत नाहक भितीचे वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता नाही. कल्याण डोंबिवली महानगरपालिके अंतर्गत याबाबत जनजागृती करण्यांत येत आहे. तसेच याबाबत लक्षणाप्रमाणे असणारे औषधे उपलब्ध आहेत.

नागरीकांनी खबरदारीचा एक भाग म्हणुन श्वसनाच्या संसर्गापासुन बचाव करण्यासाठी ’काय करावे, काय करू नये’ यासंदर्भात शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत कडोंमपा कार्यक्षेत्रातील जनतेला खालीलप्रमाणे सुचना देण्यांत येत आहे.
जेव्हा आपल्याला खोकला किंवा शिंका येत असेल तेव्हा आपले तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यु पेपरने झाका. साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारीत सॅनिटायझरने आपले हात वांरवांर धुवा. ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणा पासुन दुर रहा. भरपुर पाणी प्या आणि पौष्टिक खा. संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन **(Ventilation)** होईल याची दक्षता घ्या.

हस्तांदोलन करू नका. टिश्यु पेपर आणि रुमालाचा पुर्ण वापर, आजारी लोंकाशी जवळचा संपर्क, डोळे, नाक आणि तोंडाला वांरवार स्पर्श करणे हे करू नये. नागरीकांनी घाबरुन जाऊ नये कोणत्याही प्रकारची लक्षणे आढळुन आल्यास ताबडतोब नजीकच्या दवाखान्यात, रुग्णालयाशी संपर्क साधावा असे आवाहन वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दिपा शुक्ल यांनी केले आहे.

# विज्ञान प्रदर्शनात तळेगाव हायस्कूल प्रथम क्रमांकाचे मानकरी



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/मुरबाड(प्रतिनिधी) :**

पदमश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नति मंडळ भिवंडी संचलित तळेगाव विभाग हायस्कूल या विद्यालयाने दिनांक ९ जानेवारी,१० जानेवारी २०२५ रोजी सेवा सहयोग आणि आदित्य बिर्ला फॉउंडेशन आयोजित विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल त्यांना सेवा सहयोग फॉउंडेशनचे शेट्टी सर,ज्ञानेश्वर घोलप सर या मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले आणि सहभागी विद्यार्थी लावण्या देशमुख,हर्षला यशवंतराव,उत्कर्षा देशमुख,प्रज्ञा सोष्टे,अनुष्का हलपतराव त्या विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे संस्थाध्यक्ष आदरणीय विजय जाधव साहेब आणि सर्व पदाधिकारी,विद्यालयाच्या मुख्याध्यापिका फुलपगारे मॅडम, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे कल्पेश शिंदे सर,कोळी सर,जयश्री मॅडम, पंढरीनाथ देशमुख या सर्वांवर विद्यार्थी पालक तळेगाव पंचक्रोशीतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .प्रथम क्रमांकाचे मानकरी म्हणजे आपल्या सर्वांच्या मेहनतीची आणि सचोटीतून केलेल्या कार्याची सुवर्णमुद्रा आहे.असं मत त्या विद्यालयाचे शिक्षक श्री कल्पेश शिंदे सर यांनी व्यक्त केलें..आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या..

# २४ गाव सेझ विरोधी संघर्ष समितीची सभा संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/पेण(प्रतिनिधी)**

निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर प्रथमतः सेझ विरोधी संघर्ष समितीची सभा , ॲड. नंदू म्हात्रे यांच्या निवासस्थानी संपन्न झाली. या सभेस सुमारे ५० सभासद उपस्थित होते. संघर्ष समितीचे अध्यक्ष, कै.दिलीप पाटील व सचिव आर.के.पाटील यांच्या निधनाने एक पोकळी निर्माण झाली,त्यामुळे खारे पाट,हमरापुर विभाग,साई विभाग या मध्ये समन्वयाचा अभाव दिसत होता तो भरून काढण्यासाठी आणि येणारे गेल पाइप लाइन, तिसरी महा मुंबई,सेझ,मेट्रो, प्रकल्प,विरार अलिबाग कॉरिडॉर, कांदळ वन, वनखात्याचे हवाई पाहणी, अशे अनेकप्रश्न



भविष्यात उद्भवणारे आहेत. त्याचा सामना करायचं झाल्यास शेतकरी वर्गाची शक्ती एकत्रित राहिली पाहिजे.तर आणि तरच शेतकरी वाचेल ही भूमिका या सभेत मांडण्यात आली. कोणताही लोकप्रतिनिधी आत्ता पर्यंत सेझ जमिनी ताब्यात देण्यात यशस्वी झाला नाही,हा नाराजीचा सुर होता.त्यामुळे आत्ता आपण एकसंघ राहून आपले प्रश्न सरकार दरबारी ठामपणे मांडले पाहिजे.

सध्या रायगडात महायुती असल्यामुळे आपले प्रश्न सहज सुटले पाहिजे ,मागील मंत्री वि.खे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत जयंत पाटील, धैर्यशिल दादा यांच्या बरोबर दोन मीटिंग झाल्या,आश्वासन मिळाले मात्र अजून काहीही निर्णय झाला नाही.त्यामुळे पुन्हा हा लढा तीव्र करावा लागेल.गेल पाइप लाइन समुद्र मार्गे नेता येत नाही त्यामुळे बरीच शेती बाधित होऊन शेतकरी देशोधडीला लागेल.**mmrda** काय आहे,काय देणार,याविषयी संभ्रम आहे. वनखाते जमिनी गिळंकृत करेल ही भीती आहे या विषयी सभेत चर्चा करण्यात आली.नवीन भूमिका ठरविण्यासाठी रविवार १९/०१/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता ,जगदंबा माता मंदिर वाशी पेण येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे...
या सभेस निवृत्त अधिकारी, सुभाष म्हात्रे, नंदू म्हात्रे,नंदू मोकल, कृष्णा मोकल, चंद्रहास म्हात्रे, काशिनाथ पाटील आदिसह प्रत्येक विभागातील सभासद उपस्थित होते...

# कल्याणचे क्रीडा शिक्षक सोलापूर महानगरपालिका क्रीडा अधिकारी पदी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :**

कल्याणचे क्रीडा शिक्षक डॉक्टर भूषण जाधव हे सोलापूर महानगरपालिका क्रीडा अधिकारी पदी नुकतेच रुजू झाले. तलवारबाजी या खेळाचे एनआयएस कोच असणारे डॉक्टर भूषण जाधव हे कल्याणच्या सेक्रेड हार्ट शाळेचे क्रीडा शिक्षक म्हणून कार्यरत होते. तलवारबाजी या खेळामध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर मजल मारली. तलवारबाजीच्या या कामगिरीबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार देऊन ही नुकतेच गौरवण्यात आले होते. या सर्व कार्याची दखल घेत सोलापूर महानगरपालिकेने त्यांची सरळ क्रीडा अधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली.



मूळचे छत्रपती संभाजीनगर चे असणारे डॉक्टर भूषण जाधव यांनी लहानपणापासूनच डॉ. उदय डोंगरे, अशोक दुधारे यांच्या मार्गदर्शनाखाली तलवारबाजी या खेळांमध्ये आपले करिअर करण्याचे आव्हान स्वीकारले. कुटुंबातूनही त्यांना या खेळासाठी पूर्ण पाठिंबा आणि सहकार्य मिळाले. त्यामुळेच त्यांनी तलवारबाजी या खेळामध्ये अनेक आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय राज्य स्पर्धा बरोबरच तलवारबाजी प्रशिक्षणासाठी विदेश दौरे ही केले. या खेळाचे एनआयएसचे पहिले प्रशिक्षक म्हणून ही त्यांनी राज्यात मान पटकावला. तलवारबाजी या खेळामध्ये त्यांना डॉ. उदय डोंगरे, अशोक दुधारे, सेक्रेड हार्ट स्कूलचे संचालक अल्बिन ॲंथोनी यांचे मार्गदर्शन लाभले.
तर या निवडीबद्दल त्यांचे डॉ उदय नाईक, प्रा. लक्ष्मण इंगळे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते अंकुर आहेर, अविनाश ओंबासे, प्रताप पगार, राम म्हात्रे, विश्वास गायकर, विजय सिंग, महादेव क्षीरसागर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका

# शिक्षण विभागाचा उल्हास मेळावा उत्साहात संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :**

नवभारत साक्षरता अभियान अंतर्गत कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण विभागाचा उल्हास मेळावा अभिनव विद्यालय, पारनाका, कल्याण ( प. )येथे प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण यांचे प्रमुख उपस्थितीत काल संपन्न झाला. या मेळाव्याची सुरवात दीप प्रज्वलनाने झाली या मेळाव्यास महानगरपालिका शिक्षण विभागातील २१ सीआरसींचे दिलेल्या विषयानुसार स्टॉल लावण्यात आलेले होते आणि या ठिकाणी साक्षरता अभियानाचे अतिशय सुंदर साहित्य प्रदर्शित करण्यात आलेले होते. या उल्हास मेळाव्यामध्ये २१ सीआरसी प्रमुख, मुख्याध्यापक



, सहा.शिक्षक, विद्यार्थी , समग्र शिक्षा अभियान च्या सहाय्यक कार्यक्रम अधिकारी अर्चना जाधव,अभिनय विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.संपत गीते तसेच विषयतज्ञ चंद्रमणी सरदार,. तंत्रस्नेही शिक्षक विलास लिखार , शिक्षण विभागाचा इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता. यावेळी नवसाक्षर ,असाक्षर आणि त्यांचे स्वयंसेवक यांनी देखील त्यांचे मनोगत यावेळी व्यक्त केले.

या मेळाव्यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले, त्यामध्ये सर्व सीआरसी मधून साक्षरतेवर आधारित पथनाट्य तसेच गीत, तसेच जनजागृतीपर नाटिका सादर करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.राजाभाऊ शेप विषयतज्ञ यांनी केले. संतोष पाटील , विषयतज्ञ यांनी आभार प्रदर्शन केले, या उल्हास मेळाव्याचे व्यवस्थापन हे समग्र शिक्षा अभियानाच्या कर्मचाऱ्यांनी केले.या कार्यक्रमाचा उद्देश महानगर पालिका क्षेत्रात साक्षरतेविषयी जनजागृती होणे हा होता. खूप उत्साहवर्धक आणि आनंदी वातावरणामध्ये हा उल्हास मेळावा संपन्न झाला.या नवभारत साक्षरता उल्हास मेळाव्याचे आयोजनासाठी प्रशासनाधिकारी रमेश चव्हाण, शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांचे मार्गदर्शन लाभले.



Adv. **हरेश इदनानी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना श्री प्रकाश डांगळे**(PRO **उल्हासनगर यांचे पतीदेव)**

# भिवंडी महापालिकेच्या प्लास्टिक निर्मूलन पथकाचा व्यापाऱ्यांना दणका



## नायलॉन मांजा आणि प्लास्टिक पतंगांच्या साठयावर जप्तीसह दंडात्मक कारवाई

**प्लॅस्टिक निर्मुलन व नायलॉन मांजाच्या विक्रीस प्रतिबंध, दंडात्मक व जनजागृती करून प्रभावीपणे कार्यवाही करणेकामी नव्याने एकुण १० कर्मचा-यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यानुसार कार्यवाही यापुढे चालू राहणार आहे.**
**- सुदाम जाधव,निर्धारण अधिकारी (पर्यावरण) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.**

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/भिवंडी(प्रतिनिधी) :**

मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे निर्देशानुसार महानगरपालिकेचे प्लॅस्टिक निर्मुलन पथकांनी दिनांक १९/१२/२०२४ रोजी मे. संतोषी पर्ल विडस्, टेमघर, यांची रु. ५०००/- दंड, दिनांफ २०/१२/२०२४ रोजी मे. नवकार पेपर, अंजुरफाटा यांना रु. ५०००/- दंड, दिनांक ६/०१/२०२५ रोजी, मे. लिबर्टी हॉटेल आणि आम्रपाली बार अँड रेस्टॉरंट यांना अनुक्रमे रु. १०,०००/- दंड, दि. ८/०१/२०२५ रोजी, मे. आशापुरा किराणा स्टोअर्स भादवड आणि मे. वेलकम हॉटेल, कल्याणनाका यांना अनुक्रमे रू. १०,०००/- दंड दि. १०/०१/२०२५ रोजी, मे. विलास वाईन्स, धामणकरनाका यांना रु. ५०००/- दंड या ठिकाणी धाड टाकली असता जनरल आयटम्स्, प्लास्टिक पिशवी (अविघटनशील एकल वापर प्लॅस्टिक) साठा अंदाजे ५०० किलो माल जप्त करण्यात आलेला आहे. जप्त केलेला माल मनपाच्या आरोग्य भांडारगृहात जमा करण्यात आलेला आहे. संबंधित दुकानदार यांना अविघटनशील प्लॅस्टिक साठवणुक करीता एकुण रक्कम रु. ३५,०००/- दंड आकारण्यात आला आहे.

तसेच नायलॉन मांजाच्या विक्रीस व वापरास प्रतिबंध घालण्यावाचत पर्यावरण विभागामार्फत दिनांक २९/११/२०२४ रोजी जनसंपर्क विभागास दैनिक वृत्तपत्रात जाहीर आवाहन प्रसिध्द कळविण्यात आले होते. व त्यानुसार प्रसिध्द करण्यात आली. तसेच सहा. आयुक्त, प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ ते ५ यांना पर्यावरण विभागामार्फत नायलॉन मांजाच्या विक्रीस व वापरास प्रतिबंध घालण्याबायत दिनांक ०२/०१/२०२५ रोजी कार्यवाही करणेबाबत पत्र देण्यात आले आहे. तसेच आज दि. १०/०१/२०२५ रोजी दुकान विक्रेते यांच्याकडुन नायलॉन मांजा व प्लॅस्टिक पंतगाचा साठा पकडण्यात आला.

# वृत्तपत्र लेखक संघातील वृत्तपत्र लेखक व पत्रकारांचा जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने सत्कार

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :**

जनमनाचा कनोसा घेणारा वृत्तपत्र लेखक पत्रकारितेतील एक अविभाज्य घटक आहे.पत्रलेखक राजकीय, शैक्षणिक,सांस्कृतिक,सामाजिक अशा विविध विषयांवर सडेतोडपणे आपल्या लेखन शैली द्वारे विचार व्यक्त करत असतो.आता बरेचसे वृत्तपत्र लेखक कवी,पत्रकार,संपादक आहेत.त्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.६जानेवारी या पत्रकार दिनाचे औचित्य साधून जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघातील पत्रकार,वृत्तपत्र लेखक,कवी यांचा छोटेखानी सत्कार समारंभ कल्याण येथील



डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानात आयोजित करण्यात आला होता.सर्व प्रथम प्रमुख पाहुणे ॲन्टीपायरसी सेल मुंबई चे तपाशी अधिकारी रामजित गुप्ता सर व समता साहित्य अकादमीचे महाराष्ट्र चे अध्यक्ष,राष्ट्रपती पदक पुरस्कार प्राप्त दिलीप नारकर सर यांचे संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी शाल,श्रीफळ,भेटवस्तू,गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी प्रास्ताविक केले.त्यानंतर ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघातील पत्रकार,कवी,वृत्तपत्र लेखक प्रा.उदय सामंत,विवेक मालशे,दिवाकर गोळपकर,सुनिल इंगळे,नाना म्हात्रे,आर.एन.पिंजारी,सुधाकर कांबळी,सुनिल झळके,मनोहर गायकवाड,आनंदराव देसाई,बी.डी. गायकवाड,आशा पडवळ,सुरेखा गावंडे,अनिता कळसकर यांचा प्रमुख पाहुणे रामजीत महादेव गुप्ता व दिलीप नारकर यांच्या हस्ते शाल,नोटंगी डायरी,कुळकर्णी ब्रदर्सचे पॉकेट कॅलेंडर,संस्थेचा अहवाल,गुलाब पुष्प,पेन बॉक्स अशा स्वरुपात आकर्षक’सन्मानपत्र ’प्रदान करुन यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी दिवाकर गोळपकर, प्रा.उदय सामंत,सुनिल झळके,अनिता कळसकर यांनी आपले विचार व्यक्त केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डोंबिवली येथील मिठाईचे व्यापारी कुळकर्णी ब्रदर्स,सामाजिक कार्यकर्त्या कल्याण वाक्कर,सुनिल इंगळे,संस्थेचे खजिनदार दत्ता कडुलकर यांचे विशेष सहकार्य लाभले. शेवटी संस्थेच्या विनंतीला मान देऊन सर्व मान्यवर उपस्थित राहिल्याबद्दल अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी सर्वांचे आभार मानले.

# महापालिका क्षेत्रातील पोस्टर,बॅनर,होर्डिंग,झेंडे काढण्याची धडक कारवाई

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :**

जनहित याचिका क्रमांक १५५/२०११ मधील मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिसरात अनधिकृत बॅनर, पोस्टर्स, झेंडे आणि होर्डिंग काढण्याची तीव्र मोहिम राबविण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांनी दिले होते. त्याअनुषंगाने माहे डिसेंबर २०२४ मध्ये १०८५ पोस्टर, २८६७ बॅनर, १९ होर्डिंग, २४६, झेंडे काढण्यात आले आहेत. तात्पुरत्या स्वरूपात बॅनर लावण्यासाठी परवानगीचे अधिकार संबंधित प्रभागाचे सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांना देण्यात आले आहेत. दि. ०१ जानेवारी २०२५ पासून अनधिकृत बॅनर लावणाऱ्या २७ जणांवर महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, १९९५ च्या तरतुदीचे उल्लंघन प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापुढेही अनधिकृत बॅनर, पोस्टर्स, झेंडे आणि होर्डिंग काढण्याची कार्यवाहीची मोहीम सुरू राहणार आहे. तरी नागरिकांना आणि राजकीय पक्षांना महा पालिका परिक्षेत्रात तात्पुरत्या स्वरूपात बॅनर लावण्यासाठी संबंधित प्रभागक्षेत्र कार्यालयाकडून परवानगी घेण्यात यावी, असे आवाहन अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे उपआयुक्त अवधुत तावडे यांनी केले आहे.

# सानपाडा गोळीबार प्रकरणी एक अटक

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/नवी मुंबई(प्रतिनिधी) :**

सानपाडा येथे एपीएमसीतील कंत्राटदार राजाराम टोके यांच्यावर बेछूट गोळीबार प्रकरणातील व्यक्तीला पुण्यातून अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. एपीएमसीतील कचरा उचलण्याच्या कंत्राट वादातून हा गोळीबार करण्यात आला होता. गोळी झाडणारे दुचाकीवरून आले होते. गोळीबार करून दोघेही फरार झाले होते. याच प्रकरणातील दुचाकी चालक संतोष गवळी (वय ३८ राहणार कोपरी) याला पुण्यातून अटक करण्यात आली आहे. शनिवारी त्याला न्यायालयात हजर केले असता १४ तारखे पर्यंत पोलीस कोठडी फर्माविण्यात आली आहे. अशी माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांनी दिली.

## धर्मवीर प्रतिष्ठान यांच्या वतीने

# आदिवासी पाडयात शालेय साहित्य वाटप

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/मुलुंड(प्रतिनिधी) :**

खारघर मधील फणसवाडी आदिवासी पाड्यात आरोग्य दूत श्री.बाजीराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते यावेळी धर्मवीर प्रतिष्ठान यांच्या वतीने नवी मुंबईमधील खारघर येथील फणसवाडी आदिवासी पाड्यातील मुलांना शालेय साहित्य आणि खाऊ वाटप करण्यात आले. श्री.सतीश शिंदे,अजय घोड़के, सुनील चव्हाण,प्रीतम देशमुख,डॉ.दिगंबर अकोलकर,शाळेचे शिक्षक श्री.राम शेळके यांच्या मार्गदर्शनानुसार हा कार्यक्रम पार पडला.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# अपंगत्व असुनही मोलाची कामगिरी !

**मुलुंड(प्रतिनिधी)**

सोलापूर, महाराष्ट्राचा अभिमान असलेला सुयश नारायण जाधव हा भारतीय पॅरालिम्पिक जलतरणातील एक चमकता तारा आहे.

२८ नोव्हेंबर १९९३ रोजी जन्मलेल्या सुयशने जलतरणाच्या S7 श्रेणीत आपली आवड आणि मेहनतीने एक नवा टप्पा गाठला आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये त्याच्या दमदार कामगिरीमुळे त्याला भारताचा अभिमान तर आहेच पण करोडो लोकांसाठी प्रेरणाही आहे.

सुयशची कथा आपल्याला शिकवते की कितीही अडथळे आले तरी खरे समर्पण आणि आत्मविश्वास यशाचा मार्ग मोकळा करतो. आपल्या अपंगत्वावर मात करून मानाचा तुरा मिळवून तरूणाई स लाजवेल अशी कामगिरी फत्ते करून दाखवली खरच करावे तेवढे कौतुक कमीच आहे अभिमान वाटतो.तुझ्या कार्य,कौशल्यांचा अभिनंदन आणखीन मोठे यश मिळावे.तर सलाम तुझ्या जिद्दीला...





# जुन्या आठवणींना उजाळा देत माजी विद्यार्थी आले एकत्र



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/पेण(प्रतिनिधी)**

बालपणीचा काळ सुखाचा असं म्हटलं जातं. यात या बालपणीच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कामार्ली व हेटवणे प्रकल्पग्रस्त माध्यमिक विद्यालय वाकरुळ या शाळेतील १९९८ - ९९ सालातील माजी विद्यार्थी तब्बल २५ वर्षांनी नुकतेच सन्नी फार्म हाऊस वाक्रुळ येथे स्नेहमेळाव्या निमित्त एकत्र आले. शाळेतील मस्ती, एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, शाळेतील क्रीडा स्पर्धा, स्नेह संमेलन,शिक्षकांनी केलेली शिक्षा अशा विविध विषयांवर माजी विद्यार्थ्यांनी गप्पा मारत जुन्या आठवणींना उजाळा दिला. या गप्पांच्या ओघात आपण सर्वजण इतके मोठे झालो हे देखील विसरून गेले होते.

पेण तालुक्यातील कामार्ली व हेटवणे प्रकल्पग्रस्त माध्यमिक शाळेत शिक्षण घेतलेले विद्यार्थी आज राजकारण, उद्योग,शिक्षण व सामाजिक क्षेत्रात आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटवत असून या स्नेह मेळाव्यासाठी हे सर्व विद्यार्थी पेण, कर्जत, खालापूर, मुंबई येथून आलेले होते. या विद्यार्थ्यांनी यावेळी आपआपला परिचय करून दिल्यानंतर काही गमतीदार आणि चांगल्या आठवणींना उजाळा दिला. तसेच आज आपण जे काही आहोत त्यामागे आपल्या शाळेने केलेले संस्कार व दिलेली उत्तम शिकवण यामुळेच आहेत अशी शाळेबद्दलची कृतज्ञता यावेळी माजी विद्यार्थ्यांनी बोलताना व्यक्त केली.

# रेल्वेच्या कारवाईत बाधीत झालेल्या नागरिकांना बीएसयूपीत घरे द्या

## शिवसेना कल्याण पूर्व शहर प्रमुख निलेश शिंदे यांची मागणी



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :**

कल्याण पूर्वेतील प्रभाग क्रमांक ९४ मधील मिलिंद नगर आणि आनंदवाडी येथील ११० घरांवर झालेल्या रेल्वे प्रशासनाच्या कारवाईविषयी ही घटना स्थानिक पातळीवर मोठ्या चर्चेचा विषय बनले आहे. रेल्वेने याआधी संबंधित नागरिकांना नोटीस दिल्या असून १० जानेवारी २०२५ रोजी काही घरांवर थेट कारवाई करण्यात आली आहे. या घटनेवर माजी नगरसेवक निलेश शिंदे आणि इतर स्थानिक नेत्यांनी आवाज उठवला आहे. माजी नगरसेवक निलेश शिंदे माजी नगरसेवक प्रमोद पिंगळे, माजी परिवहन समिती सदस्य बाळा पिंगळे आणि उप शहरप्रमुख कृष्ण साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने याप्रकरणी महापालिका अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांच्यासोबत बैठक घेतली. यावेळी सुमारे ११० घरासाठी बीएसयुपी मधील घरे उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

रेल्वेच्या प्रस्तावानुसार काही लोकांना एमएमआरडीएच्या माध्यमातून पनवेल पळस्पे येथील जागेवर पुनर्वसनाचे प्रस्ताव दिले आहेत. परंतु स्थानिक रहिवाशांनी कल्याण परिसरातच पुनर्वसनाच्या मागणीवर ठाम जोर धरला आहे. यावेळी माजी नगरसेवक निलेश शिंदे आणि स्थानिक नेत्यांनी असे सुचवले की एपीएफसी माध्यमातून काही वर्षांपूर्वी रेल्वेने कल्याण डोंबिवली महापालिकेला साधारण काही कोटी दिलेली होती. परंतु आपण त्यांना घरे देऊ शकलो नाही. ती निधी रक्कम परत करण्यापेक्षा ती रक्कम बीएसयुपी घरे उपलब्ध करून देण्यासाठी वापरली जावी. यामुळे रेल्वेचा खर्च वाचेल आणि स्थानिक नागरिकांचे पुनर्वसन कल्याण मध्ये होईल. सध्या ही कार्यवाही प्रलंबित असून स्थानिक प्रशासन, रेल्वे आणि रहिवाशांमधील चर्चेचा तोडगा कसा निघतो याकडे स्थानिक बाधित रहिवाशांचे लक्ष लागले आहे.

# टोकावडे शारदा विद्यालयात विद्यार्थ्यांना दिले जाते पोषण आहार



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ मुरबाड(प्रतिनिधी)**

मुरबाड कल्याण राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या जनसेवा शिक्षण मंडळ संचालित शारदा विद्यालय टोकावडे येथे विद्यार्थ्यांना शाळेय पोषण आहार/ राष्ट्रीय मध्यान्ह भोजन योजना अंतर्गत ताजे आणि सकस, गरमा गरम पोषण आहार द्वारे चांगल्या प्रकारेचे जेवण दिले जाते. अशा प्रतिक्रिया येथील विद्यार्थीनी दिल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांना गरमागरम उकडलेली अंडीही वेळेवर दिली जात आहेत.

शारदा विद्यालय टोकावडे येथे सन २००६ मध्ये किचन शेडचे उत्तम रित्या बांधण्यात आलेले आहे यामध्ये विद्यार्थ्यांना चुलीवरचे जेवण दिले जात आहे . ही एक शारदा विद्यालयाची कौतुकस्पद कामगिरी आहे त्यामुळे मुलांना दर्जेदार जेवण, तसेच स्वच्छ पाणी देण्यासाठी आम्ही सर्व शिक्षक वर्ग तसेच स्टाफ चांगली मेहनत घेत आहोत अशी माहिती या विद्यालयाचे मुख्याध्यापक काशिनाथ गोडांबे यांनी दिली आहे.

# कै संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी)**

मस्साजोग येथील सरपंच कै संतोष देशमुख यांची निर्घूनपणे हत्या करणाऱ्या आरोपींना लवकरात अटक करून त्यांच्या विरोधात जलदगती न्यायालयात खटला चालवीला जावा यासंदर्भात भारतीय मराठा संघ संस्थापक अध्यक्ष अविनाश पवार यांच्या मार्गदर्शनानुसार दि.१० जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

आपल्या शिवरायांच्या सुसंस्कृत महाराष्ट्रात राजरोसपणे असे हत्याकांड दिवसागणिक होत आहेत याची खंत व्यक्त करून त्या विरोधात निषेध नोंदविण्यात आला. तसेच या प्रकरणाची स्वतंत्र तपास यंत्रणेद्वारे सखोल व निपक्ष चौकशी होण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा नेमावी. यासाठी उज्ज्वल निकम यांच्यासारख्या अनुभवी व निष्णांत वकिलाची नियुक्ती करण्यात यावी. सदर प्रकरणाचा लवकरात लवकर निकाल लागावा यासाठी जलदगती न्यायालयाची स्थापना करावी. सर्व आरोपींना कठोरात कठोर शिक्षा (फाशी) होण्याची व्यवस्था करावी. अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या.यावेळा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अविनाश पवार, सचिव एस डी पाटील, उपाध्यक्ष दीपक पालांडे,उपाध्यक्षा अनघा जाधव, ठाणे/ रायगड जिल्हा संपर्क प्रमुख अरुण फणसे, ठाणे जिल्हा अध्यक्ष प्रकाश पाटील, ठाणे जिल्हा सचिव अनिल काकूळते,ठाणे शहर अध्यक्ष उमेश गोगावले, उपाध्यक्ष देवेंद्र पानकर, सचिव कृष्णा शिगवण, ठाणे शहर महिला अध्यक्षा उषा केंजळे, संघटक राकेश मोरे, मिलिंद भोसले, नारायण उतेकर आदी उपस्थित होते.

# आरटीआय कार्यकर्ते शांताराम पाटील यांना ग्रामपंचायत सदस्यांकडून मारण्याची धमकी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील)**

(माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ आंदोलनाच्या पावित्र्यात.)

भिवंडी तालुक्यातील दाभाड ग्रामपंचायतच्या सरपंच व सदस्यांनी सरकारचा कायदा असताना ग्रामपंचायतच्या मासिक सभेत बसण्याची कायदेशीर रित्या मागितलेली परवानगी नाकारल्याने दाभाड गावचे नागरिक तथा आरटीआय कार्यकर्ते शांताराम गोविंद पाटील हे गेल्या दोन वर्षांपासून सबंधित प्रशासनाकडे दाभाड ग्रामपंचायतीच्या या हुकूमशाही विरोधात कारवाई करण्याची मागणी करत आहेत. परंतु आजपर्यंत प्रशासनाकडून प्रत्यक्ष कारवाई होत नसल्याने माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ ठाणे जिल्ह्याच्या वतीने दाभाड ग्रामपंचायत सरपंच व सदस्य कमेटी बरखास्त करण्यात यावी या मागणीसाठी दि.१३ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा परिषद ठाणे यांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले होते त्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांनी दि.६ जानेवारी २०२५ रोजी ग्रामपंचायत दाभाड सदस्य कमेटी व आंदोलक शांताराम पाटील तसेच गटविकास अधिकारी पंचायत समिती भिवंडी यांना त्यांच्या दालनात या विषयावर सुनावणी साठी बोलावले होते त्यावेळी दालनात उपस्थित झालेल्या ग्रामपंचायत सदस्यांनी शांताराम पाटील यांना अरेरावी करण्यास सुरुवात केली आणि मारहाण करण्याची धमकी दिली परंतु शांताराम पाटील यांच्या सोबत सहकारी कार्यकर्ते सोबत असल्याने त्यांचा बचाव झाला याबाबत पाटील यांनी श्रीनगर पोलीस स्टेशन ठाणे व पडघा पोलीस स्टेशन भिवंडी येथे तक्रार दाखल केली असुन महासंघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष शंकर वडवले यांनी पोलीस महासंचालक यांना याप्रकरणी लेखी निवेदन दिले असुन तिव्र शब्दात निषेध केला आहे तसेच प्रशासन दोषींच्या पाठिशी उभे राहून कायदा मोडणाऱ्यांना बळ देत असल्याने यापुढे हा लढा अधिक तीव्र करुन जो पर्यंत न्याय होत नाही तोपर्यंत आम्ही सर्व कार्यकर्ते शांताराम पाटील यांना साथ देऊ असे संकेत त्यांनी दिले आहेत.

## ठाणे जिल्ह्यातील ग्रामिण भागातील

# शालेय विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शन स्पर्धा संपन्न





**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ मुरबाड(बाळासाहेब भालेराव)**

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी ठाणे जिल्हा परिषदेने जिल्हास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धांचे नुकताच आयोजन केले होते. या स्पर्धांचे उद्घाटन मुख्यकार्यकारी अधिकारी छाया शिसोदे यांनी केले तर प्रास्ताविक शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या कला सादर करताना पाहणतांना आनंद होतो. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देणे आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा शासनाचा प्रयत्न आहे. स्पर्धेसाठी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेत मुरबाड, शहापुर भिवंडी, कल्याण अंबरनाथ तालुक्यातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.अत्यंत चुरशीच्या या स्पर्धेत वकृत्व - लहान गट प्रथम - मुरबाड - कार्तिकी घरत, द्वितिय - शहापुर - तन्मेश घुले, तृतिय - भिवंडी - तनिष्क पाटील, मोठा गट प्रथम - शहापुर - व्यास गायकर, द्वितिय - कल्याण - लावण्या शिसवे, तृतिय - भिवंडी - ईस्मत शेख, समुहगान लहान गट प्रथम - शहापुर, द्वितिय - भिवंडी, तृतिय - मुरबाड , मोठागट प्रथम - अंबरनाथ, द्वितिय - शहापुर,तृतिय - कल्याण, लोकनृत्य प्रथम - अंबरनाथ, द्वितिय - कल्याण, तृतिय - शहापुर, नाट्यस्पर्धा - प्रथम - भिवंडी, द्वितिय - मुरबाड तृतिय - कल्याण, शैक्षणिक साहित्य निर्मिती - प्रथम - मुरबाड - संदिप धुमाळ, द्वितिय - शहापुर - सुनिल परटोले, तृतिय - कल्याण - .रमेश मंगल्या म्हसकर विजयी सर्व स्पर्धकांचे व मार्गदर्शकांचे ठाणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने मनपुर्वक अभिनंदन करण्यात येत असल्याचे जिल्हाध्यक्ष भगवान भगत यांनी सांगितले.

# हापूस केसरने पण भाव खाल्ला,पहिली पेटी वाशी मार्केटला



**डझनला ३,२०० रुपये**

देवगडच्या शकील मुल्ला यांनी पाठविलेल्या पाच डझन आंब्याची पेटीला १६,००० रुपये भाव मिळाला आहे. प्रत्येक डझनाची किंमत ३,२०० रुपये आहे. एका आंब्यासाठी २६६ रुपये आहे.

# ‘संगी’ चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर प्रदर्शित | मैत्रीचा गोडवा आणि हसण्याचा स्फोट

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी)**

अर्मोक्स फिल्म्स आणि यंत्रणा फिल्म्स निर्मित, सुप्रीम मोशन पिक्चर्स आणि सत्यम ज्वेलर्स प्रस्तुत ‘संगी’ या बहुप्रतीक्षित हिंदी चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. चित्रपटाच्या टिझरने आधीच प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता निर्माण केली होतीच आणि आता ट्रेलरमधून चित्रपटाचा मनोरंजक प्रवास अधिकच समोर आला आहे. हलकीफुलकी



कथा, मैत्रीतील गोडवा, आणि हास्याचा अफाट डोस यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांच्या हृदयाला भिडेल, हे नक्की!

‘संगी’ची कथा तीन मित्रांभोवती फिरताना दिसत असून या तिघांच्या आयुष्यातील बालपणापासूनचे गंमतीशीर,आनंददायी क्षण यात हलक्याफुलक्या शैलीत मांडण्यात आले आहेत. चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये मैत्री, पैसे आणि त्यातून येणारे रंजक वळण दिसत आहे. आता ही मैत्री आणि पैसे हे नेमके काय प्रकरण आहे, याचे उत्तर चित्रपट पाहिल्यावरच मिळणार आहे. ‘संगी’ हा चित्रपट १७ जानेवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

चित्रपटाचे दिग्दर्शक सुमित कुलकर्णी म्हणतात,’ ‘संगी’ हा चित्रपट मित्रांच्या फक्त गंमतीजंमतींचीच गोष्ट नाही तर मैत्रीची खरी खोली उलगडणारी कथा आहे. हलक्या फुलक्या विनोदांमधूनच आम्ही प्रेक्षकांना विचार करण्यास भाग पाडणारी कथा सादर केली आहे. तीन मित्रांची ही कथा प्रेक्षकांच्या हृदयाला स्पर्श करेल, याची मला खात्री असून प्रत्येक वयोगटातील प्रेक्षकांनी चित्रपटगृहात जाऊन हा चित्रपट नक्की पाहावा.’

# मुंबईत हवेची गुणवत्ता खालवल्याने श्वसनाच्या आजारात वाढ

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ मुंबई(प्रतिनिधी)**

गेल्या काही दिवसांपासून मुंबईतील हवेची गुणवत्ता ढासळत चालली आहे. त्यामुळे मुंबईकरांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. मुंबईतील हवेची गुणवत्ता १५६ इतकी नोंदवण्यात आली आहे. तर हवेतील २.५ पीएमचं प्रमाणही कमी होताना दिसत नाही. तसेच पीएम १० चे प्रमाणही जैसे थे स्थितीत आहे. यामुळे मुंबईकरांना श्वसनाचे आजार मोठ्या प्रमाणात होत आहेत.

**मुंबईतील वायू प्रदूषणात वाढ**

गेल्या काही दिवसांपासून सातत्याने मुंबईतील वायू प्रदूषण वाढत आहे. त्यामुळे मुंबई महापालिका आणि राज्याच पर्यावरण विभाग अलर्ट मोडवर आहे. मुंबईच्या वायू प्रदूषणावर सरकारकडूनही कठोर कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत. तर दुसरीकडे मुंबई महापालिकेकडून वॉटर कॅनन फवारणी केली जात आहे. मुंबईतील विविध भागात वॉटर कॅनन फवारणी केली जात असली तरी याचा फारसा फरक जाणवत नाही.

एचएमपीव्ही व्हायरसचा धुमाकूळ दरम्यान गेल्या काही दिवसांपासून जगभरात ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस म्हणजेच एचएमपीव्ही (HMVP) हा व्हायरस धुमाकूळ घालत आहे. हा श्वसनाशी संबंधित व्हायरस आहे.

# आता कळणार एसटीचं लाईव्ह लोकेशन

राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या सोयीसाठी व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टिम ॲप आणले आहे. VLT च्या माध्यमातून प्रवाशांना एसटीचे थांबे, बस स्थानकात बस किती वाजता येणार हे २४ तास अगोदर कळेल. या ॲपच्या माध्यमातून प्रवाशांना लालपरीचे लोकेशन मोबाईल वर कळेल. त्यासाठी एसटी तिकिटावरील क्रमांकाच्या माध्यमातून प्रवाशांना बस स्थानकात एसटी किती वाजता येणार हे कळेल. एसटीच्या ताफ्यातील सर्वच बसेसला व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टिम बसवण्यात येणार आहे. त्यामुळे प्रवाशांना या ॲपच्या माध्यमातून बसची सध्यस्थिती, लोकेशन कळेल.

# अनधिकृत शाळांविरुद्ध शिक्षण विभाग ॲक्शन मोडवर

## अनधिकृत शाळांविरुद्ध शिक्षण विभागाने केले गुन्हे दाखल

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी)**

ठाणे शहराचा विस्तार ज्या वेगाने होत आहे, तेवढ्याच वेगाने ठाणे शहरात अनधिकृत शाळांचे पेऊ फुटले आहे. यावर्षी ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाने सुमारे ७५ अनधिकृत शाळांना ऑक्टोबर २०२४ मध्ये नोटीसा पाठवून सदर शाळा ताबडतोब बंद करण्यास संबंधित संस्था चालकांना कळवले होते. परंतु बहुतांशी संस्थाचालकांनी या आदेशाला केराची टोपी दाखवत या शाळा राजरोसपणे चालू ठेवल्या आहेत.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व पालकांचे आर्थिक नुकसान होऊ नये व या संस्थाचालकांच्या अरेरावीला चाप बासावा म्हणून शिक्षण विभाग, ठाणे महानगर पालिका यांनी या शाळांवर कायदेशीर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे, नुकतेच शिक्षण विभागाने दिवा, खर्डी गावातील ब्रायटन इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल व वेंट व्हॅली इंटरनॅशनल स्कूल या दोन शाळांच्या संस्थाचालक व व्यवस्थापकांविरुद्ध डायघर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे.

शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी या शाळांना भेटी दिल्या असता या शाळांनी शासन मान्यतेची कागदपत्रे दाखविण्यास असमर्थता दर्शवली. विशेष म्हणजे शासनाची कोणतीही परवानगी नसताना शाळा सोडल्याचा दाखला शाळेचा नमुन्यात देण्यात येत असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. तसेच शाळेच्या फी साठी देण्यात येणारी पावती, मुख्याध्यापकांचा सही शिक्का, प्रगती पुस्तके शासनाची मान्यता नसतानाही विनापरवानगी शाळेमध्ये वापर करून विद्यार्थी व पालकांची फसवणूक करत असल्याचे निदर्शनास आले आहे अनधिकृत शाळा सुरू करून चालू ठेवल्याबद्दल शासनाने ठरवून दिलेली दंडाची रक्कम न भरता शासनाची आर्थिक फसवणूक, बनावट सही शिक्का, प्रगती पुस्तके, शाळा सोडल्याचा दाखला देऊन फसवणूक केल्याप्रकरणी या दोन्ही शाळांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यापूर्वीही २९ अनधिकृत शाळां विरुद्ध शिक्षण विभागाने गुन्हे दाखल केले आहेत. यामुळे अनधिकृत शाळाचालकांचे धाबे चांगलेच दणाणले आहे. असे प्रभारी अधिक्षक विजय साळवे यांनी सांगितले आहे.

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी